उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२८० ■ सोमवार १३ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## मध्यपुर्वेत तणाव वाढल्याने भारताचा महत्वपूर्ण निर्णय रशियाकडून ऐकोणपन्नास ह. कोटी रुपयांचे तेल आयात



**नवी दिल्ली, दि. १२ : अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा एकदा तणाव वाढला आहे. याचा परिणाम सर्वच देशांवर होत असल्याचे दिसत आहे. विशेषतः तेलाच्या आयात निर्यातीवर मोठा परिणाम होत आहे. भारताला आता कच्च्या तेलाच्या आयातीसाठी केवळ आखाती देशांवर अवलंबून राहायचे नाही. त्यामुळे भारताने रशियासह इतर अनेक देशांकडून मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. भारताने रशियाकडून ऐकोणपन्नास हजार कोटी रुपयांचे तेल खरेदी केले आहे.**

सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअरच्या अहवालानुसार, जून २०२६ मध्ये भारताने रशियाकडून ५.५ अब्ज युरो किंमतीचे हायड्रोकार्बन्स (जीवाश्म इंधन) खरेदी केले. यापैकी ८३ टक्के वाटा केवळ कच्च्या तेलाचा होता. ज्याची किंमत ४.५ अब्ज युरो (४९००० कोटी युरो) होती. या विक्रमी खरेदीमुळे, भारत चीननंतर (७.३ अब्ज डॉलर) रशियन तेलाचा जगातील दुसरा सर्वात मोठा खरेदीदार बनला आहे.

**निर्यात वाढूनही महसुल घट**

भारताकडून कच्च्या तेलाची खरेदी वाढल्यामुळे रशियाच्या कच्च्या तेलाच्या निर्यातीत १४ टक्के वाढ झाली आहे. परंतु, सवलतींमुळे कच्च्या तेलाच्या निर्यातीतून मिळणारा महसूल महिन्यागणिक ८ टक्केने घटून प्रतिदिन ३४८ दशलक्ष युरो झाला आहे. अहवालात पुढे म्हटले आहे की, रशियाच्या एकूण निर्यातीत सात टक्के वाढ होऊनही, रशियाच्या जीवाश्म इंधन निर्यातीतून मिळणारा महसूल एक टक्क्याने घटून प्रतिदिन ७३४ दशलक्ष युरो झाला आहे. याचा अर्थ असा की, भारत आणि इतर आशियाई देशांना तेल विकल्यानंतरही, आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती कमी झाल्यामुळे आणि मोठ्या सवलतींमुळे रशियाच्या महसुलात ८ टक्के घट झाली आहे.

**भारत रिफायनरी केंद्र**

भारत रशियाकडून कमी किमतीत तेल (पान ४ वर)

## शाळा बंद आंदोलन केले एक दिवसांचा पगार नाही

पुणे, दि. १२ : राज्यभर नऊ जुलैस शाळा बंद ठेऊन आंदोलनात सहभागी झालेल्या शिक्षकांवर शिक्षण विभागाने कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. आंदोलनात सहभागी झालेल्या आठ हजार ६२९ शिक्षकांचा एका दिवसाचा पगार कपात करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षण संचालकांनी दिली आहे.

शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील काही शिक्षक संघटनांनी ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलनाचे आवाहन केले होते. या आंदोलनाला राज्यातील अनेक शिक्षकांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. मात्र, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि नियमित शाळा सुरू राहाव्या यासाठी शासनाने आंदोलनापूर्वीच स्पष्ट भूमिका घेतली होती. कोणत्याही परिस्थितीत शाळा बंद ठेवू नयेत आणि (पान ४ वर)

## शहाद्यातील समाज कल्याण वस्तीगृहात अन्नातून विषबाधा; चाळीस विद्यार्थी बाधित, पाच जण गंभीर



**शहादा, दि.१२ (प्रतिनिधी) - नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील मोहिदा त.श. शिवारातील समाज कल्याण विभागाच्या शासकीय निवासी अनुसूचित जाती, नवबौद्ध मुलांच्या वस्तीगृहात शनिवारी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. रात्रीचे जेवण केल्यानंतर सुमारे ४० विद्यार्थ्यांना एकाच वेळी विषबाधा झाली असून, यात ५ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक मात्र धोक्याच्या बाहेर आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी रात्री विद्यार्थ्यांना जेवणात शेवग्याची भाजी, भात आणि पोळी देण्यात आली होती. जेवणानंतर काही वेळातच विद्यार्थ्यांना पोटदुखी, उलट्या, मळमळ, चक्कर आणि अस्वस्थता जाणवू लागली. बघता-बघता बाधितांची संख्या सुमारे ४० वर पोहोचली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच वस्तीगृह प्रशासनाने सर्व विद्यार्थ्यांना तातडीने शहादा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यामुळे रुग्णालयात एकच धावपळ उडाली. डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर उपचार सुरू केले. उपचारादरम्यान पाच विद्यार्थ्यांची प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना पुढील उपचारासाठी शहरातील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तर उर्वरित विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयातच उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच पालकांनी मोठ्या संख्येने ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. आपल्या मुलांच्या जीवाशी खेळ झाल्याचा आरोप करत संतप्त पालकांनी वस्तीगृह प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. काही काळ रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थी आणि पालकांचा (पान ४ वर)

**धुळे, दि.१२ - धुळे जिल्ह्यात २०२४-२५ या कालावधीत रस्ते अपघातांमध्ये सुमारे ६५ ते ७० टक्के मृत्यू हे दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर न केल्यामुळे झाल्याचे दिसून आले. हेल्मेट सक्तीचा उद्देश केवळ दंडात्मक कारवाई नसून जीव वाचवणे हा आहे. या मोहिमेमुळे एक जरी प्राण वाचला, तरी आमचा उद्देश सफल झाला, असे आम्ही मानतो.**

### हेल्मेट सक्ती चालकांच्या फायद्याची

## अपघातातील सर्वअधिक मृत्युचे प्रमाण हेल्मेट न वापरल्यामुळे आहे



यासंदर्भात जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे माहिती दिली की, या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वारांनी हेल्मेट परिधान केले असते, तर बहुतांशी जीव वाचले असते. जेव्हा कुटुंबातील कर्ता पुरुष जातो, तेव्हा त्याचा विपरीत परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. या पार्श्वभूमीवर मागील आठवड्यापासून शहरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये हेल्मेट वापराबाबत जनजागृती करून कारवाई सुरू करण्यात आली आहे. ही मोहीम कोणतीही नवीन कारवाई नाही. हेल्मेट वापरण्याबाबतचा कायदा पूर्वीपासून अस्तित्वात आहे. सध्या केवळ त्याची टप्याटप्याने प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. हेल्मेट सक्तीचा उद्देश हा केवळ दंडात्मक कारवाई नसून जीव वाचवणे हा आहे. या मोहिमेमुळे एक जरी प्राण वाचला, तरी आमचा उद्देश सफल झाला, असे आम्ही मानतो.

ज्यांच्या आचरणाकडे संपूर्ण समाज आदर्श म्हणून पाहतो व जो वर्ग देशाचे तरुण घडविण्याचे कार्य करतो, त्यांच्या आचरणातून आणि वर्तनातून कायदा सर्वोच्च असून त्यांचे पालन व प्रभावी अंमलबजावणी ही (पान ४ वर)

## शिंदखेडा येथे तरुणावर शुल्लक वादातून हल्ला

धुळे,दि.१२ - विरदेल (ता. शिंदखेडा) शिवारात हुल दिल्याच्या किरकोळ कारणावरून वाद झाला. त्यावरुन तरुणावर एकाने तलवारीने हल्ला केला.

मेहुल रतनसिंग राजपूत (वय ३१, रा. लंघाणे, ता. शिंदखेडा) असे जखमीचे नाव आहे. नऊ जुलैस रात्री दहाच्या सुमारास विरदेलहून गावाकडे जात होता. रस्त्यावरील आबाजी हॉटेलजवळ भरधाव येणाऱ्या कारने त्यांच्या वाहनाला हुल दिली. त्याबाबत विचारणा केल्यावर दोघांमध्ये वाद झाला. कार मधील आकाश बापू वडर (२९, रा. साईनगर, शिंदखेडा) याने मेहुल राजपूत याच्याशी (पान ४ वर)

## मुख्यमंत्र्यांच्या व्यापक धोरणामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ - कुणाल पाटील

**धुळे, दि.१२ - मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी व्यापक धोरणाचा विचार करुन शेतकरी हिताला प्राधान्य देत शेतकरी कर्जमुक्तीबाबत पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्वाधिक शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ होणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्या नेतृत्वाखाली भाजपा महायुतीचे सरकार हे शेतकऱ्यांचे सरकार असून बळीराजाच्या सर्वांगिण कल्याणासाठी निर्णय घेत असल्याचे धुळे ग्रामीणचे मा.आमदार कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी कर्जमुक्ती योजना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी अधिक लवचिक केली असून राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळावा म्हणून पावसाळी अधिवेशनात कर्जमुक्तीबाबत महत्वाची घोषणा करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर धुळे ग्रामीणचे मा.आमदार कुणाल पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे कि, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांच्या कल्याणाचे आणि महाराष्ट्राच्या विकासाचे असंख्य महत्वपूर्ण घेतले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दूरगामी विचारातून आणि दूरदृष्टीतून शेतकऱ्यांना नव्याने स्वाभिमानाने उभे रहाता यावे म्हणून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होकळर कर्जमुक्ती योजना (पान ४ वर)

## धुळ्यातील जिरेकर नगरमध्ये घरफोडी

धुळे,दि.१२ - येथील जिरेकर नगरमधील घरातून चोरट्यांनी ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. वत्सलाबाई धुडकू पाटील यांचे शासकीय डेअरी परीसरात प्लॉट क्रमांक २१ जिरेकर नगर मध्ये घर आहे.

घराचे दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. घरातील ४५ हजार रुपये किंमतीचा ऐवज लांबविला. कुटुंबीय बाहेर असल्याने घर काही दिवसापासून बंद होते, शुक्रवारी (ता.१०) सकाळी घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. चोरट्यांनी सोन्याची मंगल पोत, अंगठी आणि कानातील दागिने, चांदीची लक्ष्मी मूर्तींचा त्यात समावेश आहे. वत्सलाबाई पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल झाला.

## पार्श्वगायिका एस. जानकी यांचे ८८ व्या वर्षी निधन



म्हैसूर, दि.१२ : सुप्रसिद्ध पार्श्वगायिका एस. जानकी यांचे म्हैसूर येथे शनिवारी (दि.११) वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. चाहत्यांमध्ये आणि संगीत विश्वात त्या जानकी अम्मा या नावाने ओळखल्या जायच्या. जानकी अम्मा यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक उत्कृष्ट गाणी सादर केली. त्यांच्या अतुलनीय अभिनयामुळे त्यांना चार राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले. संगीतातील योगदानाबद्दल त्यांना तेहतीस राज्य चित्रपट पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात आले होते. (पान ४ वर)

## नेपाळमध्ये पुन्हा तरुणाईकडून आंदोलनाचा पवित्रा पंतप्रधानांची हुकूमशाही, तिघांचा आत्मदहन प्रयत्न

**काठमांडू, दि. १२ : नेपाळमधील तरुणांचा वाढता संताप पुन्हा एकदा रस्त्यावर उतरला आहे. तीन दिवसांत, तीन तरुणांनी पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर एक जण गंभीररित्या भाजल्याने रुग्णालयात दाखल आहे. पंतप्रधान बलेंद्र शाह बालेन यांच्या राजीनाम्याची मागणी तीव्र झाली आहे. राजधानी काठमांडूमध्ये तरुण आंदोलन करत आहेत. तर विरोधी पक्ष, नेपाळी काँग्रेसने**



**सरकारवर तरुणांमध्ये आशा आणि आत्मविश्वास निर्माण करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे. बालेन शाहांवर हुकूमशाहीचा आरोप होत आहे.**

झेन-जी नेपाळ संघटनेने पंतप्रधान बालेन शाह यांच्यावर जनविरोधी आणि हुकूमशाही पद्धतीने शासन केल्याचा आरोप केला आहे. संघटनेचे म्हणणे आहे की, तरुणांचा रोजगार आणि उत्पन्न वाढवण्यासाठी अर्थसंकल्प आणि धोरणांमध्ये कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. पुर्वी २०२३ मध्ये प्रेम आचार्य यांनी केलेल्या आत्मदहनाची घटनाही चर्चेत आहे. त्यावेळी काठमांडूचे महापौर असलेल्या बालेन शाह यांनी या घटनेला शासनाचे संपूर्ण अपयश म्हटले होते. आता, सध्याच्या घटनांवरील त्यांचे मौन विरोधी पक्ष आणि आंदोलकांच्या निशाण्यावर आले आहे. नेपाळमध्ये वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे (पान ४ वर)

### अल्पवयीन मुलीशी बळजबरीने विवाह

## कुंडाण्यात एकावर गुन्हा

धुळे, दि.१२ - कुंडाणे (वेल्हाणे, ता. धुळे) येथील एका तरुणाने अल्पवयीन युवतीशी बळजबरीने नाशिक येथे नेत विवाह केला. तेथेच तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी तरुणासह तीन जणांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

राजेंद्र शिवाजी सोनवणे (वय २७) असे त्या तरुणाचे नाव आहे. यातील पिडीता ही अल्पवयीन असल्याचे माहित असुन सुध्दा नाशिक येथे चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देतो, असे आमीष दाखवून एसटी बसने धुळे बस स्थानकावरुन तिला नाशिक येथे नेले. तेथे (पान ४ वर)

## एस.आय.आर मोहिमेला शिवसैनिकांनी हलक्यात घेऊ नये घरोघरी जाऊन फॉर्म भरून घ्यावे; आ. चंद्रकांत रघुवंशी

**नंदुरबार, दि.१२ (प्रतिनिधी)- विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एस.आर.आय कार्यक्रमाला कार्यकर्त्यांनी हलक्यात घेऊ नये. शिवसैनिकांनी प्रत्येक घरादारापर्यंत जाऊन नागरिकांकडून एस.आर. आयचे शासनाने दिलेल्या मुदतीत फॉर्म भरून घ्यावेत. या कार्यक्रमांतर्गत कोणाचेही नाव वगळले जाणार नाही याची काळजी घ्या. अगर नाव मतदार यादीतून वगळले गेले तर याच्या थेट आपल्यालाच निवडणुकीत परिणाम दिसतील असे स्पष्ट मत शिवसेना नेता माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी व्यक्त केले.**




नंदुरबार येथील लोकनेते स्व.दादासाहेब बटेसिंगभैया रघुवंशी सभागृहात नंदुरबार विधानसभा शिवसेना-युवा सेना विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत बुथ प्रमुखांची बैठक रविवारी सकाळी घेण्यात आली. यावेळी आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर जिल्हाप्रमुख ड.राम रघुवंशी, शेतकी संघाचे चेअरमन बी.के पाटील,माजी सभापती विक्रमसिंह वळवी होते. तालुकाप्रमुख डॉ. सयाजीराव मोरे उपस्थित होते.

यावेळी आ.रघुवंशी यांनी सांगितले, शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे एस.आय.आर मोहिमेकडे विशेष लक्ष आहे. दररोज पक्षाच्या वरिष्ठांकडून आढावा घेण्यात येत आहे. शिवसैनिकांनी एस.आर. आय कार्यक्रम अत्यंत गांभीर्याने घ्यायचा आहे. शासनाने दिलेले फॉर्म विहित मुदतीच्या आत शिवसैनिकांनी नागरिकांकडून भरून घ्यायचेत. जिल्हाप्रमुख ड.राम रघुवंशी म्हणाले, नंदुरबार विधानसभेत जेवढे पण गाव आहेत त्या गावांमधील शिवसेनेच्या बुथ (पान ४ वर)



## पोलिस प्रशासन व हस्ती ग्रुप ऑफ स्कूलच्या वतीने अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीचे यशस्वी

**दोंडाईचा वि. प्र.- महाराष्ट्र पोलिस प्रशासन दोंडाईचा ठाणे तसेच हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेज , हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅलीचे पोलिस निरीक्षक दिनेशजी सोनवणे व हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलासजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाली.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की आजच्या तरुणाईला व्यसनाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी आणि अमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत समाजात वाढती व्यसनाधिनता रोखणे हा यामागील उद्देश होता. सदरील रॅली छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा नंदुरबार चौफुली येथून रॅलीस सुरुवात झाली. बस स्टँड, ग्यानचंद मेडिकल, निर्मल चौक, छ. शिवाजी (पान ४ वर)

## जोशाबा मंडळातर्फे वृद्ध व दिव्यांगांसाठी सोनगीरला विविध मोफत सेवा देणार

**सोनगीर, दि.१२ (प्रतिनिधी)- येथील जोशाबा सांस्कृतिक क्रीडा मंडळाच्या वतीने वृद्ध, रुग्ण आणि अपंग बांधवांच्या सन्मानार्थ विविध लोकोपयोगी योजना सुरू करण्यात आल्या आहेत, अशी माहिती महाराष्ट्र शासनाचा दलित मित्र पुरस्कार प्राप्त व मंडळाचे अध्यक्ष दिलीप सुका माळी (रुग्ण मित्र) यांनी दिली.**

या उपक्रमांतर्गत सोनगीर व पंचक्रोशीतील गरीब आणि गरजू रुग्णांसाठी नियमितपणे ममोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले जाणार असून, दररोज नाव नोंदणी सुरू राहील; यासाठी महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी नंदुरबार येथील कांता लक्ष्मी शहा नेत्रालयाचे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असतील. ग्रामपंचायतीने या सेवाभावी संस्थेसाठी इमारत उपलब्ध करून दिली असून नुकतीच त्याची पाहणी करण्यात आली आहे.

तसेच, मंडळाने सोनगीर गावातील ७५ (पान ४ वर)

## धुळ्यात वृद्धेला मारहाण सोन्याची चैन हिसकावली

धुळे, दि.१२ - शहरातील चितोड रोड ध्वज चौकातील वृद्धेच्या घरात मध्यरात्री घुसून दोन जणांनी मारहाण केली, त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्याची सोन्याची पोत बळजबरीने हिसकावुन घेतली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी एकाला अटक केली.

येथे माधवी चंद्रकांत नेमाणे (वय ७४) यांचे वास्तव्य आहे. शनिवारी मध्यरात्री संशयित मयुर ऊर्फ बबुआ सुरेश कंदारे, राहुल ऊर्फ बिल्ला काशिनाथ शेलार (दोन्ही रा. चित्तोड रोड धुळे) यांनी घरात प्रवेश केला. माधवी नेमाने यांना ढकलुन दिले, त्यानंतर हात घट्ट पकडुन मारहाण केली. त्यांच्या गळ्यातील दोन (पान ४ वर)

## वरून खालपर्यंत सर्वच बरबटलेले अधिकारी ऐकणार कोणाचे : गोटे

**धुळे, दि. १२ : प्रशासनातील मुख्य पदांवरील नेमणूका करताना मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होतात, हे आता लपून राहिलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून अपात्र व्यक्ती स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचा प्रमुख सहज होतो का. राज्याच्या पातळीपासून जिल्हा पातळी पर्यंत सर्वत्रच गैरव्यवहार करण्यावर भर दिला जात आहे. तेव्हा राज्यकर्त्यांनी कुणालाही नितीमुल्यांच्या गोष्टी सांगू नये, अशा आशयाचे पत्रक माजी आमदार अनिल गोटे यांनी प्रसिध्दीस दिले आहे. त्यात त्यांनी सर्वच पातळीवरील गैरव्यवहारावर टीका केली आहे.**

माजी आमदार अनिल गोटे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, देण्या-घेण्याचा आर्थिक व्यवहार झाल्या शिवाय जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हाधिकारी, आयुक्त या पदांवर नियुक्तीच होऊ शकत नाही. तब्बल ६२ दिवस पोलीस कोठडीत काढलेल्या पोलीस अधिकाऱ्याची स्थानिक गुन्हा अनवेषण शाखेच्या प्रमुखपदी झालेली नियुक्ती ही उगाच झालेली नाही. या नियुक्तीत मोठा आर्थिक व्यवहार झाल्याची पोलीस अधिकाऱ्यांमध्येच खुलेआम चर्चा होत आहे. माध्यमांमध्ये त्याबाबत टीकाही झाली आहे. लाचलुचपत प्रतिबंध विभागाची कारवाई झालेल्या, कोठडीत राहिलेल्याची प्रशासकीय पातळीतील प्रमुख पदावर नियुक्ती केली जाऊ नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे आहेत. पण, त्याकडे सहज दुर्लक्ष झाले, असे म्हणता येत नाही. पालिका आयुक्ताची नियुक्ती करायची असेल तर त्या व्यक्तीकडून मोठी रक्कम घेतली जाते. तेव्हा अशा अधिकाऱ्यास दरडावून सांगणे कसे शक्य आहे, असेही गोटे यांनी पत्रकात म्हटले आहे. जिल्ह्यात मटका, विमलचा गुटखा, गौण खनिज, वाळू तस्करी, गांजा, भांगचे व्यवहार सर्रास होत आहेत. त्याविषयी पोलिसांना माहित नाही, असे म्हणणे धाडसाचे होईल. असे असताना त्याबाबतचे पत्र पोलिस अधीक्षकांना (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,32,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,44,300 रु.+3% GST
चांदी- 2,29,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



# आपला महाराष्ट्र

## ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी

शुध्द बिजा पोटी फळें रसाळ गोमटी असा वाक्प्रचार आपल्याकडे पिढ्यानपिढ्या चालू आहे.पण तो केवळ वाक्प्रचार नाही तर असंख्य पिढ्यांपासून चालत आलेले वास्तव आहे.बीज जर शुध्द असेल तर त्यातून उगवणारे रोप किंवा झाड आणि त्यास येणारी फळे रसाळ आणि निकोप गोमटी असतात.जर बीज अशुध्द असेल तर त्याची फळे देखील अशुध्द असतात.विषाचा वृक्ष लावला तर त्याची फळे विषारीच असणार हे ठरलेले असते.जो मुद्दा फळांना लागू आहे तो माणसांना तसेच जनावरांनाही लागू आहे.माणसांत परिवर्तन शक्य असते.लहानपणीच घरात,शाळेत, महाविद्यालयात, समाजजीवनात जर संस्कारांचे पैलू पडले तर ती पिढी पैलू पडलेल्या हि-या प्रमाणे चकाकते.पुढे आपल्या सोबत पुढच्या पिढीलाही मार्गदर्शन करते. त्यामुळे समाज आणि देश पुढे जात असतो. विशेषत: सार्वजनिक किंवा राजकीय क्षेत्रात आलेल्या घटकांची जडण घडण संस्कारांच्या परिप्रेक्ष्यात झाली तर दोन्ही क्षेत्रे निकोप होऊ शकतात.पण तसे आजच्या घडीला महाराष्ट्रात घडत नाही.गेल्या एका तपाच्या काळातील महाराष्ट्राची सार्वजनिक आणि राजकीय घडी विस्कळीत झालेली आढळते.राजकारणाचा बाज बदलल्याने ही अवस्था निर्माण झालेली आहे.१९६० साली महाराष्ट्राची स्थापना झाली.तेव्हा यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होते.ते स्वत:स्वातंत्र्याच्या लढ्यात होते.त्यांनी तुरुंगवास भोगला होता.त्यांच्या सोबतचे मंत्रिमंडळातील सहकारी, आमदार खासदार बहुतेक काँग्रेसचे आणि महात्मा गांधी यांच्या चळवळीशी संबंधीत होते.गांधीजीचे तत्वज्ञान अंगिकारलेले खूप लोक होते .गांधीजींच्या सप्त पाप कर्मात सिध्दांता शिवाय राजकारणाचा समावेश होता.तशा प्रकारचे राजकारण करणारे बहुसंख्य देशभक्तच होते.त्यांनी आब राखून राजकारण केले.स्वातंत्र्य मिळाल्या नंतर १९७५ पर्यंत म्हणजे जवळपास अठ्ठावीस वर्षे राजकारणातील नैतिकता शाबूत होती. खान्देशातील प्रत्येक तालुक्यात तसे नेतृत्व होते.अनेकांनी राज्याचे देखील नेतृत्व केले. काँग्रेस,जनता पार्टी,जनता दल,भाजपाला धुळे जिल्ह्याने अध्यक्ष दिले.तेवढा धुळे जिल्ह्याचा दरारा राज्यात होता.

आणिबाणीनंतर या क्षेत्रात बरीच घसरगुंडी झाली,बरीच पडझड झाली.सुमार बुध्दिचे लोक राजकारणात आले.त्यांनी त्याच पद्धतीचे राजकारण केले.त्याची पाळेमुळे खोलवर पोहचली.नंतरचा काळ तर आणखी भयानक होता.प्रादेशिक पक्ष उदयाला आले आणि त्यात अनेक सडक छाप टपोरी,शिवराळ भाषेचा सतत वापर करणारे ,प्रशासनावर जरब बसविणारे,त्यातून लोकांची कामे करणारे कार्यकर्ते तयार झाले.ते आमदार झाले, खासदार झाले,नगर सेवक झाले.गल्ली बोळात नेता आणि दादा असे समीकरण तयार झाले. सर्व सामान्यांनी त्यांना पसंत केले.त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्यासह सांसदिय राजकारण त्यांनी काबीज केले.त्यांना नैतिक दृष्ट्या परिपूर्ण अशा नेता कार्यकर्त्यांचा पर्याय इतर पक्ष देऊ शकले नाहीत.त्यामुळे नीति भ्रष्ट लोकांची सार्वजनिक आणि राजकारणातील पाळेमुळे घट्ट झाली.गेल्या बारा तेरा वर्षांत तर राजकारणाचा पूर्ण बाजच बदलला. घाऊक फोडाफोडी आपण बघितली .सगळी नीतिमूल्ये धाब्यावर बसविलेली असताना त्यांना प्रतिष्ठा व सत्ता मिळवून देण्यासाठी शासक पक्ष पुढाकार घेऊ लागला.कोणीही या,भ्रष्टांनो या,शुध्द पवित्र व्हा सत्तेत वाटा घ्या पण आमच्या पक्षात या अशा पध्दती सुरु झाल्या.राजधानीतून नगरपालिकेच्या निवडणुकीची सूत्रे हलू लागली.कुठलीही किंमत मोजून स्थानिक स्वराज्य संस्था,विधान परिषद, ताब्यात ठेवण्यासाठी उपाय योजना आखण्यात आल्या आणि यश पदरात पाडून घेण्याची जिद्द तयार झाली.परिणामी जे राजकारणात येतील ते जरब तर बसवतीलच. तशी व्यवस्था लोकांनीही स्वीकारली हे महत्वाचे म्हणावे लागेल.जिथे भले भले पाकिटांची वाट बघतात किंवा त्यासाठी लाचार होतात तिथे आणखी काय अपेक्षा ठेवणार? म्हणजे मनी,मसल पॉवर ज्यांच्या कडे असेल त्यांनाच लोकांनी नेतृत्व प्रदान केलेले आहे.

अशा प्रकारच्या अवनती झालेल्या राज्यात महिला डॉक्टरांना मारहाण किंवा त्यांच्या प्रतिष्ठेला नख लावणे स्वाभाविकच आले. असे लोकप्रतिनिधी ज्या पक्षाने जन्माला घातले त्या पक्षाचे आणि राज्याचे काय होईल याबाबत वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. डोंबिवलीच्या महिला डॉक्टरांच्या अंगावर संघटीतपणे हात घालणे हे त्या पक्षाच्या संस्कृतीला शोधणारेच कृत्य आहे. एवढे कृत्य करूनही पोलीस त्यांना अटक करणे टाळत होते. महाराष्ट्रातील तमाम आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी उठाव केला मोर्चे काढले, निदर्शने केली. काम बंद केले. तेव्हा कुठे आरोपींना पोलिसांनी अटक केली. संबंधितांचे पद काढून घ्यावे अशी मागणीही कार्यकर्त्यांनी केली.पुढचे काम न्यायालयाने केले.न्यायालयातही पोलिसांनी वकिलांना त्रास देऊन आरोपींची बडदास्त ठेवण्याची काळजी घेतली. संबंधित लोकसेवक ज्या पक्षात आहे तो पक्ष किंवा त्या पक्षाचे नेते त्याच्याविरुद्ध काय कारवाई करतात ते भविष्यात कळेलच. कदाचित काहीच कारवाई होणार नाही. अशोक खरात संदर्भातील अनुभव ताजा असून राजकीय क्षेत्रातील जे कोणी त्याच्याशी संबंध असलेले होते त्यांच्या विरुद्ध कुठलीही कारवाई करण्यात येणार नाही हे केव्हाच स्पष्ट झालेले आहे. तसेच हे प्रकरण असेल. जर कारवाईच करावयाची झाल्यास ठिकठिकाणी अशा प्रकारचे गणंग विविध पक्षांनी पेरलेले आहेत. त्या सर्वांना पक्षातून काढून टाकावे लागेल. त्यामुळे पक्ष रीता होईल. मग नेत्यांचे राजकारण कसे चालेल असा प्रश्न पडू शकतो. म्हणूनच कारवाई होत नाही. पण म्हातारी मेल्याचे दु:ख नाही काळ सोकावतो त्याप्रमाणे आपल्या राज्यातील शासकांची कार्यपद्धती आहे. म्हणूनच ज्या गावच्या बोरी असतात त्याच गावच्या बाभळी आहेत. जे पेराल तेच उगवते. खुद्द पेरणारेच जेव्हा सर्वो च्च सभागृहात टपोरी भाषा वापरतात तेव्हा त्या राज्याच्या एकूणच दर्जाची चर्चा न केलेली बरी. भाडेके टट्टे,कुत्ते सोशल मीडियापर पैसे लेकर बोलते है.उन्हे नहीं छोडेंगे.अशा प्रकारची महाराष्ट्राची संस्कृती निश्चितच नाही.पण त्या पातळीपर्यंत महाराष्ट्र नेऊन ठेवला आहे.जेव्हा राज्याचे प्रमुख असे बोलतात तेव्हा राज्याची बदनामी होत नाही असे कसे होईल ? मात्र एखादे काम निकृष्ट दर्जाचे झाले त्यावर लोक सोशल मीडियावर बोलणार,बाहेर जाहीर पणे बोलणार,लिहिणार,छापणार,तो त्यांचा अधिकार आहे राज्य घटनेने तसा तो त्यांना प्रदान केलेला आहे,

तेवढ्याने राज्याची बदनामी कशी काय होते हा प्रश्न निरर्थक नाही.याचा गर्भीत अर्थ असा की,खबरदार काही बोलाल,विचाराल तर आमच्याशी गाठ आहे.असा हा आजचा महाराष्ट्र आहे.त्यात भिडे वाड्यात जाऊन जे सावित्रीबाईंनी कधीच केले नाही ते करायचे त्यासाठी बहुजनांच्या महिलांचा वापर करायचा, शेतीसाठी बाजारातून बैल विकत घेतला आणि घरी नेला तरी त्याला तुरूंगाची हवा खावी लागते.तो कापायला नेतोय अशी फिर्याद दिली जाते आणि पोलीस त्या प्रमाणे कारवाई करतात.सर्व पातळीवरचा सामाजिक विद्रोह अशा प्रकारे उघड उघड सुरू आहे.यात मीडियाची भूमिकाच काही नाही.त्यांनी तर घाऊक लाचारी पत्करली.अशी स्थिती महाराष्ट्रात कधीच नव्हती.तथाकथित ऑपरेशन टायगरचे प्रचंड उदात्तीकरण,राज्याच्या प्रमुखांचे मुंबई बेटाचे स्वप्न साकारण्याचे उदात्तीकरण हेच जणू महाराष्ट्राचे प्रश्न आहेत असेच वातावरण मीडियाने तयार केलेले आहे. मिसिंग लिंक त्यातलाच एक.त्याचे शल्य नेत्यांपेक्षा मीडिया वाल्यांना अधिक.यालाच म्हणतात ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी.सगळेच गणंग आणि पुचाट तरीही त्यांचा आवाज मोठा आणि अंगात मस्ती हाच आजचा महाराष्ट्र.

## एस.व्ही.के.एम. इंजिनिअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांचे शासकीय सेवेत मोठे यश

**धुळे, दि.११- धुळे येथील एस.व्ही.के.एम. एन.एम. आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या एन.बी.ए. मान्यताप्राप्त सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय सेवेत उल्लेखनीय यश मिळवले आहे.**



विभागातील अनेक विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये कनिष्ठ अभियंता, सर्व्हेअर, नगररचना विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच नियोजन विभागातील महत्त्वाच्या पदांवर निवडले गेले आहेत. विभागातील अनेक विद्यार्थ्यांनी विविध शासकीय परीक्षा उत्तीर्ण केल्या असून काही विद्यार्थी शॉर्टलिस्ट झाले आहेत, तर काही जण अंतिम नियुक्ती व रुजू प्रक्रियेच्या प्रतीक्षेत आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची, अनुभवी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाची आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण पद्धतीची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे व विभाग :

कु. साक्षी मराठे (क्लास २, टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र), भूषण चव्हाण (ग्रुप सी, पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट (पीडब्ल्यूडी), गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र), मयुरी सूर्यवंशी (ज्युनिअर इंजिनिअर, वॉटर रिसोर्सेस डिपार्टमेंट (डब्ल्यूआरडी) आणि सर्वेअर, लँड रेकॉर्ड्स डिपार्टमेंट, सीएसएन रिजन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र), नेहा पाटील (सर्वेअर, लँड रेकॉर्ड्स डिपार्टमेंट, नाशिक रिजन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र), तेजस्विनी पाटोळे (ज्युनिअर इंजिनिअर, जिल्हा परिषद जळगाव आणि सीईए ग्रुप सी, पीडब्ल्यूडी, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र), गौरव बालडकर (ज्युनिअर इंजिनिअर, जिल्हा परिषद जळगाव, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र), आकाश मोरे (मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम फेलो , नगररचना विभाग, महाराष्ट्र शासन), पारस हरळ (ज्युनिअर इंजिनिअर, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, धुळे), श्रुती पवार (ज्युनिअर इंजिनिअर, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, धुळे). सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण अध्यापन, आधुनिक प्रयोगशाळा, प्रात्यक्षिकाधारित शिक्षण, औद्योगिक भेटी, करिअर मार्गदर्शन आणि स्पर्धा परीक्षांसाठी योग्य दिशा दिली जाते. विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी ऑटोकॅड, थ्रीडीएस मॅक्स, स्टॅड प्रो, ईटॅब्स, रेविट, सिव्हिल थ्रीडी, बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग अर्थात बीआयएम आणि क्वांटिटी एस्टिमेशन यांसारख्या आधुनिक सॉफ्टवेअर्सचे प्रशिक्षण दिले जाते.

या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रासोबतच शासकीय नोकरीच्या संधींसाठी सक्षम तयारी करता येते. सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रात रस्ते, पूल, इमारत बांधकाम, जलसंपदा, नगररचना, सर्व्हेक्षण, पर्यावरणीय अभियांत्रिकी आणि पायाभूत सुविधा विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

संस्थेच्या वतीने निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा पाठिंबा आणि विभागातील उच्चशिक्षित व अनुभवी




प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन या यशामागील महत्त्वाचे घटक असल्याचे संस्थेने नमूद केले. एन.बी.ए. मान्यताप्राप्त सिव्हिल इंजिनिअरिंग शाखा असल्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्पर्धात्मक वातावरण आणि उद्योगाभिमुख अभ्यासक्रमाचा लाभ मिळत आहे. त्यामुळे एसएनजीयू धुळेची सिव्हिल इंजिनिअरिंग शाखा विद्यार्थ्यांसाठी करिअर घडविण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.

विद्यार्थी आणि पालकांनी प्रवेशापूर्वी अभ्यासक्रम, पात्रता, फी, प्रवेशाच्या अटी आणि इतर तपशील विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा प्रवेश विभागाशी , या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. निलेश साळुंखे व सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. श्रीकांत रंधावणे यांनी केले आहे.

## लोकसंवादक संत कबीर पुस्तक इंग्रजीत प्रकाशित

साक्री, दि.१२ (प्रतिनिधी)- पंचायत समिती, साक्री येथील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, कवी डॉ दिलीप लोखंडे कबिराकार यांचे लोकसंवादक संत कबीर हे पुस्तक ठसा प्रकाशन, नाशिकने नुकतेच प्रकाशित केले आहे. जे.के.शाह आदर्श महाविद्यालय, निजामपूर येथील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा डॉ अजबराव इंगळे यांनी ते इंग्रजी भाषेत भाषांतरित केले आहे.




या पुस्तकासाठी प्रस्तावना प्रो.डॉ.सुधाकर जाधव यांनी दिलेली आहे, तर शुभेच्छा संदेश प्राचार्य डॉ अमितकुमार जयस्वाल, प्रा.डॉ.वैभव सबनिस, डॉ बबन जोगदंड बार्टी ,पुणे मधुकर पवार, उमरी सिध्दार्थ लोखंडे, नांदेड, भाग्यश्री राजपूत, शिंदखेडा यांचे आहेत. डॉ.लोखंडे यांचे लोकसंवादक संत कबीर हे यापूर्वी मराठी, हिंदी भाषेत प्रकाशित झाले आहे, साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी कवी डॉ दिलीप लोखंडे कबिराकार यांचे अभिनंदन केले आहे.



## आर.सी.पटेल मराठी माध्य.विद्या.चे खेळाडूंना बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण पदक

**शिरपूर, दि.११- शिरपूर येथील आर.सी.पटेल मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय बॅडमिंटन निवड चाचणी स्पर्धेत यशाचे शिखर गाठत सुवर्णपदक पटकावले.**

धुळे येथे दि. १९ जून २०२६ रोजी नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन संलग्नित धुळे शहर व तालुका बॅडमिंटन असोसिएशन तर्फे घेण्यात जिल्हास्तरीय बॅडमिंटन निवड चाचणी स्पर्धेत यशाचे शिखर गाठत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

भार्गव सिसोदे याने १३ वर्षे मुले एकेरी गटात प्रथम क्रमांक पटकावला. विवेक जाधव याने १७ वर्षे मुले दुहेरी गटात उपविजयी ठरला. चाणक्य सूर्यवंशी याने १९ वर्षे मुले दुहेरी गटात उपविजेतेपद पटकावले. स्पर्धेत आपल्या वयोगटात सहभाग घेऊन १३ वर्षा खालील मुले एकेरी गटामध्ये भार्गव नितीन सिसोदे याने आपल्या अप्रतिम आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत यशस्वीरित्या अजिंक्यपद पटकावले. कोर्टवर प्रतिस्पर्ध्याला पराभवाची धूळ चारत त्याने सुवर्णपदकाला गवसणी घातली. या प्रभावी कामगिरीच्या जोरावर त्याची धुळ्याच्या मुख्य बॅडमिंटन संघात निवड झाली आहे.

तसेच आर.सी.पटेल मराठी माध्यमिक विद्यालयातील चाणक्य सूर्यवंशी व विवेक जाधव या दोन्ही विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, क्रीडा चेअरमन प्रितेश पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील, प्राचार्य एस.एन.पाटील, क्रीडा समन्वयक डॉ.विनय पवार, जे.पी.पाटील यांनी कौतुक केले. खेळाडूंना क्रीडा शिक्षक मनोज पाटील, दुष्यंत पाटील, मोहसीन कुरेशी, बॅडमिंटन प्रशिक्षक स्वप्निल मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## पंढरपूरसाठी शिंदखेडा आगारातून भाविकांसाठी विशेष बसेस सेवा

शिंदखेडा, दि.११ (प्रतिनिधी)- आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे जाणाऱ्या विठ्ठल भक्तांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) शिंदखेडा आगाराकडून विशेष बस सेवेचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रेकरूंना विनासायास आणि सुखकर प्रवास करता यावा, यासाठी शिंदखेडा आगाराकडून जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

दरवर्षी शिंदखेडा तालुका आणि परिसरातून हजारो भाविक आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी जात असतात. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता, शिंदखेडा आगाराने यंदाही विशेष बसेसचे नियोजन केले आहे. यात्रेसाठी जाणाऱ्यांकरीता ग्रुप बुकिंगसाठी थेट गावात बस: जर एकाच गावातील किंवा मंडळातील किंवा त्यापेक्षा जास्त भाविकांनी एकत्र बुकिंग केले, तर त्यांना थेट त्यांच्या गावापासून पंढरपूरसाठी विशेष बस उपलब्ध करून दिली जाईल. तसेच ही बस त्यांना परत गावी सोडून येईल. सवलती लागू: शासनाने जाहीर केलेल्या नियमांनुसार महिलांसाठी सवलत (महिला सन्मान योजना) ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत प्रवास अमृत ज्येष्ठ नागरिक योजना या विशेष बस सेवेसाठीही लागू राहतील. सुरक्षित आणि हक्काच्या एसटी प्रवासाचा लाभ घ्यावा, असे आवाहन योगेश्वर शिवदे, आगार व्यवस्थापक, शिंदखेडा यांनी केले आहे.



## नंदुरबारची सात वर्षीय प्रनिका पाटलांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

शहादा, दि.११(का.प्र)- नंदुरबार जिल्ह्याची शान आणि महाराष्ट्राचा अभिमान ठरलेली सात वर्षीय प्रनिका प्रफुल्ल पाटील हिचा मुंबई येथील विधानभवनात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे नंदुरबार जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

प्रनिकाने डिसेंबर महिन्यात पुणे येथे आयोजित आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले होते. या स्पर्धेत तिने अवघ्या ३ मिनिटे ३९ सेकंदांत १२० गणिती प्रश्न अचूक सोडवून सर्वांचे लक्ष वेधले. तिच्या या असामान्य कामगिरीची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच नॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये तिच्या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. या अद्वितीय यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तिचा विधानभवनात गौरव करण्यात आला.या गौरव सोहळ्याप्रसंगी शहादा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच मंत्री गिरीश महाजन यांच्यासह अनेक आमदार, मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी प्रनिकाच्या तीव्र बुद्धिमत्तेचे व कर्तृत्वाचे भरभरून कौतुक केले आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रनिका ही औरंगपूर येथील प्रगतिशील शेतकरी सुरेश गिरधर पाटील यांची नात असून, शहादा येथील शल्यचिकित्सक ॲड.डॉ. प्रफुल्ल सुरेश पाटील यांची कन्या आहे. प्रनिकाच्या या यशामागे तिची आई निकिता पाटील यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले, तर तिच्या अबॅकस प्रशिक्षिका स्मिता सोनार यांनी तिच्यासाठी अथक परिश्रम घेतले. प्रनिकाच्या या अभूतपूर्व यशामुळे सध्या शहाद्यासह संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## हस्ती ग्रुप ऑफ प्री-प्रायमरी स्कूल्समध्ये बाल आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न



**दोंडाईचा, दि.११- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती ग्रुप ऑफ प्री-प्रायमरी स्कूल्सच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित बाल आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. हा उपक्रम संस्थेचे चेअरमन कैलास कांतिलालजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.**

या शिबिरामध्ये हस्ती पूर्व प्राथमिक विभागातील तिन्ही शाळांमधील एकूण ३२८ विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी योग्य मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. युतिका भामरे, डॉ. अवनी मंडाले, डॉ. निलेश बागुल आणि डॉ. युगंधरा सिसोदे या तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन केले.

हा उपक्रम हस्ती पूर्व प्राथमिक विभागाच्या तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापिका पूनम पाटील, स्मिता साठे आणि माधुरी पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व वर्गशिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या आरोग्य शिबिरास अनेक पालकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपल्या पाल्यांच्या आरोग्याविषयी डॉक्टरांकडून माहिती व मार्गदर्शन घेतले. तसेच तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांमध्ये काही वैद्यकीय समस्या निदर्शनास आल्या, त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेतर्फे दूरध्वनीद्वारे संपर्क करून आवश्यक माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या हस्ती ग्रुप ऑफ प्री-प्रायमरी स्कूल्सच्या या उपक्रमाचे पालकांनी व उपस्थितांनी मनःपूर्वक कौतुक केले.


प्रकाश में आज पहेलीबार




जितेंद्र, सुलक्षणा पंडीत, राकेश रोशन, बिंदीया गोस्वामी, बिंदु, सुजीत कुमार




## शब्दकोडे क्रमांक : २४०९



**आडवे शब्द :** १. संख्या '१' ३. भारताचे एक पश्चिमेकडील समृद्ध राज्य६. आकाशात उडणारे जलद प्रवासी वाहन८. मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिवंगत अभिनेत्री९. रक्त या शब्दासाठी हिंदी भाषेतील शब्द१०. नातेसंबंधांमधील अंतर १२. तात्पुरता मुक्काम १३. कौतुक, प्रशंसा किंवा न्याय मागणे१४. फुलांचा मधुर सुगंध किंवा दरवळ१५. जेवताना किंवा बसण्यासाठी वापरले जाणारे लाकडी आसन१६. अयोध्येचे राजे आणि विष्णूचे एक अवतार१८. नाकाने ओढायची एक सुगंधी पूड २०. विजय किंवा मिळवलेले यश२२. कोरा, नवीन किंवा जुन्याच्या विरुद्ध२४. केसांची बटा किंवा सुंदर कुरळ२५. अंगी आलेला आवेश, उत्साह किंवा जोश२६. डोंगरावरील किल्ला किंवा दुर्ग२८. हुशार, चतुर किंवा कावेबाज व्यक्ती३१. शरीराचा भाग (हात किंवा भुज)३२. पूर्णपणे केलेला विनाश किंवा संहार३३. जन्म देणारी आई किंवा जननी३४. भारताचे एक महान संत आणि कवी३६. सोबत किंवा बरोबर असणे३७. जखमी झालेला ३८. एक रास किंवा 'तुझ्यासाठी' या अर्थी शब्द३९. पत्रलेखनाचा सुरुवातीचा आदरयुक्त भाग४४. वस्तू, सामान किंवा व्यापारी उत्पादने४५. गरीब, दुबळा किंवा लाचार व्यक्ती४७. सन्माननीय किंवा पदवीधारक व्यक्ती४९. ऐतिहासिक थडगे किंवा समाधी स्मारक५१. जनावरांचे अन्न किंवा शेतातील खत५२. मनात किंवा अंतःकरणात५३. ओढा किंवा पाण्याचा मोठा प्रवाह५४. ठेवण **उभे शब्द :**१. एक औषधी वनस्पती ज्याच्या बियांपासून तेल निघते२. डोळ्यांत लावावयाचे एक अंजन ४. वेगवान ५. एक ग्रह ६.तब्बू, अनिल कपूर, पूजा बात्रा यांचा एक सिनेमा १०.आशीर्वाद ७. पेढे ११.एक म्हण ' अडलय माझे...' १३.किंमत १४.पुष्प १५.बटवा १६.हिंदीत-निशा १९. हिंदीत-पापणी २०.प्राण २१.मानेखालील शरीर २३.पुस्तकालय जिथे पुस्तकांचे वाचन केले जाते २५.जादूटोणा २६. चपाती बनवण्यासाठी वापरतात ते धान्य २७. पल्लवी जोशी,नसरुद्दीन शाह, सुशांत रे यांचा एक सिनेमा २९.लहर ३०. भूतांचा राजा ३१. फटाक्यातील मोठा बॉम्ब ३३. जादूटोणा करणारा ३५. खर्चाची एकूण रक्कम सांगणारा दस्तावेज ३६. हिंदीत-उपदेश ३९.धनी ४०. रादीना-उलट लिहा ४१.एक प्रसिद्ध अभिनेता- ** पाटेकर ४२. भारतातील एक उद्योग समूह ४४.बाब ४६.दुःख ४८.मज ५०. कपाळावरील केसांचा झुपका ५१. लहान खळगा

### शब्दकोडे क्रमांक : २४०८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ज | न | | वा | यू | | पा | प | | का | त |
| घ | ट | | थे | ट | | थ | र | थ | रा | ट | |
| व | | खो | | स | द | रा | | क | | को | डे |
| | वा | टे | क | रू | | र | शी | | ता | न | |
| हा | | प | ट | | डा | क | | वा | री | | मु |
| तो | र | णा | | का | ळ | | उ | | ख | रा | ब |
| डा | ग | | स | च | | प्र | ता | प | | व | ल |
| | डा | ब | र | | आ | का | र | | का | | क |
| ग | | स | ब | ब | | र | | ह | म | ला | |
| र | न | | त | ग | डा | | वि | रा | ना | | वि |
| ज | | ची | | दा | व | त | | रे | | ह | वा |
| | प | ड | सा | द | | वा | सा | | क | ल | ह |



# धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या जिल्हास्तरीय टॅलेंट सर्चच्या दुसऱ्या टप्प्याला उत्साहात सुरुवात

**शिरपूर, दि.१२ (प्रतिनिधी) - धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे जिल्ह्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रिकेट टॅलेंट सर्च उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याला मुकेशभाई पटेल सीबीएसई स्कूल (तांडे) शिरपूर येथील मैदानावर रविवारी १२ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला.**

धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या संकल्पनेतून या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

धुळे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातील गुणवंत क्रिकेटपटूंना शोधून त्यांना योग्य प्रशिक्षण व प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. जून महिन्यात पहिला टप्प्यात तालुकास्तरीय टॅलेंट सर्च चे आयोजन शिरपूर, धुळे, दोंडाईचा, शिंदखेडा व साक्री येथे करण्यात आले होते. यात वेगवेगळया वयोगटातील सुमारे १००१ मुले व मुली क्रिकेटपटूंनी सहभाग नोंदविला होता. यातून जिल्हास्तरावरील दुसऱ्या टप्प्यासाठी ५०० क्रिकेटपटूंची निवड करण्यात आली होती. जिल्हास्तरावरील दुसऱ्या टप्प्याचे आयोजन दि. १२ ते १४ जुलै दरम्यान मुकेशभाई पटेल सीबीएसई स्कूल तांडे ता. शिरपूर येथील मैदानावर करण्यात आले असून दि. १२ जुलै रोजी १४ वर्षाखालील व सर्व मुली क्रिकेटपटूंची निवड चाचणीपासून सुरुवात करण्यात आली. या निवड चाचणीत जिल्ह्यातील १४ वर्षाखालील मुलांचे तसेच मुलीं क्रिकेटपटूंचे कौशल्य परीक्षण करण्यात आले. १४ वर्षाखालील मुलांच्या वयोगटात धुळे येथून ६५, शिरपूर ३०, साक्री ९, दोंडाईचा ९, शिंदखेडा १४, मुलींच्या वयोगटात धुळे १२, शिरपूर १५, साक्री ४, दोंडाईचा ३, शिंदखेडा ३ अशा प्रकारे एकूण १६४ मुलामुलींची निवड चाचणी घेण्यात आली. या प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या खेळाडूंना जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे पुढील प्रशिक्षण, मार्गदर्शन व उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या टॅलेंट सर्च उपक्रमाला खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, धुळे जिल्ह्यातील क्रिकेट खेळाला सक्षम व गुणवंत खेळाडू घडविण्यास हा उपक्रम निश्चितच मोलाची भूमिका बजावणार असल्याचा विश्वास धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

## देवपूरातील बंद घरातून भांड्यांची चोरी

धुळे, दि.१२ - देवपूर मधील मयुर कॉलनीत बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी भांडे चोरून नेले. पंकज पंढरीनाथ अहिराव (वय ५०, रा. किसन कॉलनी वंजार तांडा जवळ नवापुर रोड, साक्री) यांचे घर आहे. घर बंद असल्याची संधी साधत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. ४५ हजार ९०० रुपये किंमतीचे तांबे, स्टील, पितळचे भांडे चोरून नेले. ३० मेस सकाळी घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी चौकशीअंती देवपूर पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला.


### जाहीर नोटीस

तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था, इत्यादी यांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील स. नं. ९/६ यापैकी प्लॉट नं. ३५ चे क्षेत्र १८५.४० चौ. मी. यासी चतु:सिमा पुर्वेस : ९ मी. रस्ता व ओपन प्लेस, पश्चिमेस : प्लॉट नं. ३६, दक्षिणेस : प्लॉट नं. ३८, उत्तरेस : प्लॉट नं. ३४ येणे प्रमाणे बखळ प्लॉट भाग्यश्री भास्कर पाटकर रा. देवपूर धुळे ता.जि. धुळे यांचे मालकीचे व कब्जे उपभोगातील असून यांचेकडून आमचे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. बयाणा रक्कम अदा केलेली आहे. वरील बखळ प्लॉट संबंधी कोणाची खरेदी विक्री,गहाण, बक्षिस, टाच, जप्ती, राष्ट्रीयकृत बँक बोजा, पतसंस्था बोजा, को.ऑप बँक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुखत्यारपत्र, अधिकार, सौदा पावती, वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशीलांची खात्री करुन द्यावी. मोबाईल द्वारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राद्वारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी आमच्या अशिलांवर तसेच वरील मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही.

येणे प्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे.

धुळे दि. १२/०७/२०२६

**ॲड.अमित अशोक वाघ**
नोटरी (भारत सरकार)
२२ श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
मो. ९८२३१३६००७

### CHANGE NAME

My Old Name Was
**PAWAR VITHABAI HIMMAT**
And Now
My New Name Is
**UJWALA SATISH JADHAV**
Add - A/P Boradi
Tal : Shirpur
Dist :Dhule.

### CHANGE IN NAME

My Old Name was
Miss. Runda Bhaidas Patil
Now
my New Name as per Valid Document is
Mrs. Vrunda Sunil Pawar
Add : Plot No. 70, Adarsh Colony
Deopur, Dhule - 424002


सरदार सरोवर करारावर प्रश्नचिन्ह

# मध्य प्रदेशच्या वैध हक्कांशी आणि हजारो विस्थापितांच्या पुनर्वसनाशी तडजोड होऊ नये - नर्मदा बचाव आंदोलन

बडवानी, १२ जुलै (सप्रेस) : सरदार सरोवर प्रकल्पामुळे मध्य प्रदेशात जलमय झालेल्या वनजमिनी, शासकीय जमिनी आणि इतर सार्वजनिक संसाधनांच्या भरपाईबाबत अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आंतरराज्यीय वादाच्या पार्श्वभूमीवर नुकत्याच झालेल्या करारावर नर्मदा बचाव आंदोलनाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. केंद्रीय गृहमंत्री आणि केंद्रीय जलसंपदा मंत्र्यांच्या मध्यस्थीने झालेल्या या कराराचा अधिकृत तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नसल्याने विविध माध्यमांतून समोर आलेल्या परस्परविरोधी माहितींमुळे संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे संपूर्ण करार पारदर्शकपणे सार्वजनिक करावा, अशी आंदोलनाची मागणी आहे. अन्यथा मध्य प्रदेश शासन आणि विस्थापित कुटुंबांच्या वैधानिक हक्कांवर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**धरणाची उंची वाढली, नुकसानही वाढले**

नर्मदा बचाव आंदोलनाच्या मेधा पाटकर, राहुल यादव, राजकुमार सिन्हा, गोखरू मांगल्या, शोभाराम सोलंकी आणि ओमप्रकाश पाटीदार यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन २००० पर्यंत सरदार सरोवर धरणाची उंची ९० मीटर असताना मध्य प्रदेश सरकारने प्रकल्पामुळे झालेल्या नुकसानीपोटी २८१.४६ कोटी रुपयांच्या भरपाईचा दावा केला होता. त्यामध्ये वनजमिनींसाठी ११२.५१ कोटी, शासकीय जमिनीसाठी १५७.६१ कोटी आणि जलमय झालेल्या वनक्षेत्रासाठी ११.३४ कोटी रुपयांचा समावेश होता.

त्यानंतर धरणाची उंची टप्प्याटप्प्याने ११० मीटर, १२१.९२ मीटर आणि अखेरीस २०१७ मध्ये १३८.६८ मीटरपर्यंत वाढविण्यात आली. त्याचबरोबर मध्य प्रदेशातील बुडीत क्षेत्रही मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे वनजमिनी, शासकीय जमिनी, शेतीक्षेत्र आणि इतर नैसर्गिक संसाधने पाण्याखाली गेली आणि राज्याचे नुकसान अनेक पटींनी वाढले.

आंदोलनाच्या म्हणण्यानुसार २०१९ पर्यंत १९२ गावे आणि एक नगर बाधित म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर २०२३ मध्ये सुधारित बॅकवॉटर पातळीच्या आधारे हजारो कुटुंबांना पुनर्वसनासाठी अपात्र ठरविण्यात आल्याने नवे प्रश्न निर्माण झाले आणि अनेकांच्या उपजीविकेवर परिणाम झाला.

**पुनर्मूल्यांकनानंतर ७,६६९ कोटी रुपयांचा दावा**

वाढलेल्या बुडीत क्षेत्राचा आणि सध्याच्या मालमत्तेच्या मूल्याचा विचार करून मध्य प्रदेश सरकारने २०१९-२० च्या आधारावर नव्याने मूल्यांकन केले. त्यानुसार भरपाईचा दावा वाढवून ७,६६९ कोटी रुपये करण्यात आला. हा सुधारित दावा १० फेब्रुवारी २०२२ रोजी गुजरात सरकारकडे पाठविण्यात आला. हा दावा प्रत्यक्ष नुकसान लक्षात घेऊन तयार करण्यात आल्याचे आंदोलनाचे म्हणणे आहे.

**गुजरातचा नकार**

आंदोलनाच्या मते, जवळपास दोन वर्षांनंतर २१ मार्च २०२४ रोजी गुजरात सरकारने केवळ मूळ २८१.४६ कोटी रुपयांच्या दाव्यावरच विचार केला जाईल, तर ७,६६९ कोटी रुपयांचा सुधारित दावा स्वीकारला जाणार नाही, असे स्पष्ट केले. ही भूमिका मध्य प्रदेशच्या वास्तविक नुकसानीकडे दुर्लक्ष करणारी असल्याची टीका आंदोलनाने केली आहे.

**कायदेशीर तरतुदींची आठवण**

१९७९ च्या नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार तसेच २००० पासून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयांनुसार प्रभावित राज्यांना नुकसानभरपाई आणि प्रत्येक विस्थापित कुटुंबाचे न्याय्य पुनर्वसन बंधनकारक आहे. तरीही आजही मध्य प्रदेशातील हजारो कुटुंबे पूर्ण पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असून अनेकांना जमीन, उपजीविका आणि पुनर्वसनाचे वैधानिक हक्क मिळालेले नाहीत. याच कारणास्तव उर्वरित पुनर्वसन पूर्ण करण्यासाठी मध्य प्रदेश सरकारने गुजरातकडे २,९०० कोटी रुपयांच्या अतिरिक्त आर्थिक मदतीची मागणी केली होती.

**वन टाइम सेटलमेंटवर प्रश्न**

नुकत्याच दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री आणि केंद्रीय जलसंपदा मंत्र्यांच्या उपस्थितीत मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सरदार सरोवर प्रकल्पाशी संबंधित प्रलंबित वाद मिटविण्यासाठी मवन टाइम सेटलमेंटफ करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र या कराराच्या अटी अद्याप सार्वजनिक करण्यात आलेल्या नाहीत.

उपलब्ध माहितीनुसार या कराराअंतर्गत मध्य प्रदेशने गुजरातला ५५० कोटी आणि महाराष्ट्राला २७ कोटी रुपये देणे अपेक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. कारण आतापर्यंत मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र ही दोन्ही राज्ये उलट गुजरातकडून नुकसानभरपाई आणि पुनर्वसनासाठी आर्थिक मदतीची मागणी करीत होती.

**प्रकल्प खर्चाबाबतही स्पष्टता हवी**

आंदोलनाने प्रकल्पाच्या खर्चात झालेल्या प्रचंड वाढीबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत. १९८३ मध्ये प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे ४,२०० कोटी रुपये होती. १९८८ मध्ये ती सुमारे ६,४०० कोटी रुपये मंजूर करण्यात आली. पुढे गुजरात सरकारच्या माहितीनुसार हा खर्च ७५ हजार कोटी रुपयांहून अधिक, तर माजी मुख्यमंत्री सुरेश मेहता यांच्या म्हणण्यानुसार जवळपास हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. या वाढीची कारणे आजतागायत स्पष्ट करण्यात आलेली नाहीत.

**स्टॅच्यू ऑफ युनिटीचा खर्चही जोडला?**

गुजरात विधानसभेतील चर्चांमध्ये स्टॅच्यू ऑफ युनिटी आणि त्याभोवती विकसित पर्यटन प्रकल्पांचा खर्चही सरदार सरोवर प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट करण्यात आल्याचे उल्लेख झाले होते. हा खर्च प्रत्यक्षात धरण प्रकल्पाचा भाग मानला गेला आहे का, याबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी आंदोलनाने केली आहे.

**हजारो विस्थापितांचे पुनर्वसन अद्याप अपूर्ण**

मध्य प्रदेशातील अनेक कुटुंबांना पर्यायी शेतीजमीन, पुनर्वसन भूखंड, भूखंडांची नोंदणी, उर्वरित भूखंडांचे वाटप तसेच २०१७ पासून मंजूर असलेली घरबांधणी मदत अद्याप मिळालेली नाही. अनेक पुनर्वसन स्थळांवर मूलभूत सुविधाही अपुऱ्या आहेत. त्यामुळे गुजरातकडून मागितलेले २,९०० कोटी रुपये न मिळाल्यास उर्वरित पुनर्वसन कसे पूर्ण होणार, असा सवाल आंदोलनाने उपस्थित केला आहे.

**महाराष्ट्राचे दावेही प्रलंबित**

महाराष्ट्र सरकारनेही जलमय झालेल्या ६,४८८ हेक्टर वनजमिनीबदल्यात सुमारे १,३१३ कोटी रुपये आणि पुनर्वसनासाठी ३०० कोटी रुपयांहून अधिक मदतीची मागणी केली आहे. तसेच नियोजित वीजउत्पादनाचा पूर्ण लाभ न मिळाल्याने मध्य प्रदेशने सुमारे ९०० कोटी आणि महाराष्ट्राने सुमारे ४५० कोटी रुपयांच्या भरपाईची मागणी केली आहे.

**आदिवासींच्या जलहक्कांची चिंता**

महाराष्ट्रातील नर्मदा खोऱ्यातील आदिवासी गावांच्या जलहक्कांची हमी न देता नर्मदेचे पाणी तापी खोऱ्याकडे वळविण्याच्या योजनांना २०१८ पासून ग्रामसभांचा विरोध असल्याचे आंदोलनाने नमूद केले आहे. पुरेशा निधीअभावी महाराष्ट्रातील अनेक पात्र आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसनही अद्याप रखडले आहे.

**राज्यांच्या हक्कांशी तडजोड नको**

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या वैध आर्थिक दाव्यांशी तसेच विस्थापितांच्या पुनर्वसनाशी कोणत्याही प्रकारची तडजोड होऊ नये, अशी आंदोलनाची भूमिका आहे. नुकत्याच झालेल्या करारामुळे या राज्यांचे किंवा विस्थापितांचे वैधानिक हक्क बाधित होणार नाहीत, याची सरकारने खात्री द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आंदोलनाने मध्य प्रदेश सरकारला ७,६६९ कोटी रुपयांच्या वैध भरपाईच्या दाव्यावर ठाम राहण्याचे, वन व शासकीय जमिनींची योग्य भरपाई मिळविण्याचे आणि हजारो वंचित विस्थापित कुटुंबांच्या संपूर्ण व न्याय्य पुनर्वसनासाठी आवश्यक असल्यास सर्व वैधानिक व घटनात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.


### टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे वलवाडी या गावचे शिवारातील स.नं.१०१/१/२/१ पैकी प्लॉट नं. ०६ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ.मी. बखळ प्लॉट

यासी प्लॉटची मापे व चतु:सिमा येणे प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस : | १५.०० मी. | ९ मी. रस्ता |
| पश्चिमेस : | १५.०० मी. | स.नं. १०६/३ |
| दक्षिणेस : | १०.०० मी. | प्लॉट नं. ०७ |
| उत्तरेस : | १०.०० मी. | प्लॉट नं. ०५ |

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक भिमराव रामराव पाटील रा. मु. पो. विरदेल ता. शिंदखेडा जि. धुळे यांचेशी सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०९/०७/२०२६

**ॲड.मंगेश बी.सोनवणे**
ऑफिस : एस. २, गुरुदत्त संकुल, जमनागिरी रोड, धुळे
मो. ७५८८१२७४७७/९४०४७३६७९६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँका, वित्तीय संस्था,यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

वस्ती धुळे ता. जि. धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे वलवाडी ता. जि.धुळे शिवारातील भूमापन क्र. ३०/१/३/७ या रहिवासाकडे वर्ग झालेल्या शेतजमीनीपैकी प्लॉट नं. ७, क्षेत्र १५०.०० चौ.मी. हा बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ८, पश्चिमेस : प्लॉट नं. ६, उत्तरेस ९ मी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ४ या वर्णनाचा प्लॉट श्री. मिलींद काशिनाथ सोनजे रा. विद्युत नगर, प्लॉट नं. ११, सुरतवाला बिल्डींगजवळ, स्टेशनरोड, धुळे यांच्या मालकीची व कब्जे उपभोगातील आहे.

सदर मिळकत विकत घेण्याचा सौदा मी राहुल नारायण भलकार रा. तऱ्हाडी ता. शिरपूर जि. धुळे यांनी मिलींद काशिनाथ सोनजे यांचेशी ता ११/०७/२०२६ रोजी केला असून, सदर सौदा कराराप्रमाणे बयाणा रक्कम देखील दिली आहे व लवकरच खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

सदर मिळकतीबाबत कोणाचेही काहीही व्यवहार असतील तर त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यांची लेखी हरकत मुळ कागदपत्रांसह आमच्या कार्यालयात आणून द्यावी. वरील कालावधीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. कळावे.

सदर जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत दिली असे.धुळे दि. १२/०७/२०२६

**ॲड.ज्ञानेश्वर उत्तमराव देवरे**
८२, इंद्रप्रस्थ कॉलनी, गोंदूर रोड, देवपूर धुळे मो. ९४२३२८९६९९

### जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ४९८/२०२६

१) श्रीमती सोनुबाई धुमा भिल, २) भिमा धुमा भिल,३) रमिला गणु पाटीदार
अ. नं. १ व २ रा. गधडदेव ता. शिरपूर जि. धुळे
अ.नं. ३ रा. डालका ता. जि. खरगोर (मध्यप्रदेश) ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार
कै. धुमा रतन भिल मृत्यू दि. ६/१/२०२५
मुळ गांव रा. गधडदेव ता. शिरपूर जि. धुळे .... मयत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणे येते की,

अर्जदार याने म. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर, शिरपूर यांचे कोर्टात दिवाणी कि. अर्ज नं. ४९८/२०२६ चा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८७२ कलम २ प्रमाणे वारस दाखलासाठी अर्ज केला आहे. अर्जदार नं. १ चे पती कै. धुमा रतन भिल, मृत्यू दि. ६/१/२०२५ रोजी रा. गधडदेव ता. शिरपूर जि. धुळे येथे वृद्धापकाळाने मयत झाले आहेत. अर्जदार नं. १ पती गधडदेव ता. शिरपूर जि. धुळे येथील रहिवासी असल्याने त्याचा वारस दाखला हा तसेच शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभासाठी गरजेचा होता. अर्जदार हिचे नावे लावणे कामी वारस दाखल्यासाठी अर्जदार हिने सदरचा अर्ज केला आहे.

याकामी कोणाचेही कोणतीही कायदेशीर तक्रार असल्यास मे. न्यायालयात दिनांक २१/७/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.३० वा. स्वत: किंवा वकिलामार्फत हजर राहून हरकत नोंदवावी. तसे न केल्यास मे. न्यायालयास योग्य तो पुढील आदेश करावा लागेल. याची नोंद घ्यावी.

स्थळ : शिरपूर दि. १०/०७/२०२६

सही... कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, क. स्तर शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क. स्तर शिरपूर

### जाहीर नोटीस नि. ६/ड

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ५१७/२०२६

१) जयवंताबाई उखा भिल, २) विनोद उखा भिल
३) जितेंद्र उखा भिल, नं. १ ते ३ रा. तोंदे ता. शिरपूर जि. धुळे
४) अरुणा संपत भिल, रा. बभळराज ता. शिरपूर जि. धुळे.
५) रत्ना काशिनाथ मालचे, रा. कोंडावळ ता. शहादा जि. नंदुरबार ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार
X
कै. उखा गुलाब भिल (मृत्यू : ता. ११/०१/२०२६)
रा. तोंदे ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी मयत उखा गुलाब भिल हे दि. ११/०१/२०२६ रोजी मौजे तोंदे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २९/७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.दि. १/०७/२०२६

सही... कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि. ६

**मे.दिवाणी न्यायाधीश सो. शिरपूर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज नं. ५६६/२०२६

रुखमाबाई हिरामण जाधव व ४ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती तसेच अर्जदार नं. २ व ४ चे वडील नामे हिरामण पांडू जाधव हे दि. २१/०४/२०२६ रोजी मौजे प्लॉट नं. १०७ गणेश कॉलणी पाण्याच्या टाकी जवळ, शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्याने, अर्जदार नं. १ ते ४ यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २९/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

दि. ३०/०६/२६ — आदेशावरुन

सही... कनिष्ठ लिपीक — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक

### जाहीर नोटीस नि. ६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ५११/२०२६

कमलसिंग फुलसिंग पावरा
रा. आंबे ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार
X
कै. मोटाबाई फुलसिंग पावरा, (मृत्यू : ता. १७/०९/२०२१)
रा. आंबे ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. २ यांची आई नामे मोटाबाई फुलसिंग पावरा ह्या दि. १७/०९/२०२१ रोजी मौजे आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले आहेत. मयत यांचे अर्जदार हाच एकमेव कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना मयतांचे कायदेशीर वारस म्हणून नाव लावण्यासाठी शासकीय व निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २७/७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.दि. / /२०२६

सही... कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि. ६

**मे.दिवाणी न्यायाधीश सो. शिरपूर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज नं. ५६८/२०२६

पापालाल सरिचंद राठोड व. २ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांची आई नामे रेशमिबाई सरिचंद राठोड ही दि. १२/११/२०२५ रोजी मौजे अजनाड ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्याने अर्जदार नं. १ व २ यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २९/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

दि. ३०/६/२६ — आदेशावरुन

सही... कनिष्ठ लिपीक — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक

### जाहीर नोटीस नि. ६

**मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज नं. ५६४/२०२६

कोकीळाबाई धनराज पाटील व २ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे यांचे वडील नामे धनराज हनुमंत पाटील हे दि. १८/०८/२०२० रोजी मौजे आढे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ व २ हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २९/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही... कनिष्ठ लिपीक — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक

### जाहीर नोटीस नि. ६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५१९/२०२६

१)अलका पंढरीनाथ साळुंखे वैगरे ४ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार
पंढरीनाथ दयाराम साळुंखे रा.वाघाडी ता.शिरपूर जि.धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील पंढरीनाथ दयाराम साळुंखे हे दिनांक २४/११/२०२४ रोजी मौजे सुरत येथे मयत झाले. त्याअर्थी अर्जदारांना मयताचे वारस लावण्यासाठी तसेच वारसांना शासकीय, निमशासकीय कामासाठी मयताचा वारस दाखला लागणार असल्याने वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरील अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणाची हरकत तक्रारी असेल त्यांनी आपली हरकत तक्रार स्वत: अगर वकीलामार्फत हजर होवून दि. २९/७/२०२६ पावेतो सकाळी १०.३० वाजता कोर्टात मांडावी. तसे न केल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजले जाईल व वरील वारसांच्या नावाने वारस दाखला देण्यात येईल. आज रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

दि. ९/०७/२०२६ — आदेशावरुन

सही... कनिष्ठ लिपीक, शिरपूर कोर्ट — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक, शिरपूर कोर्ट

### जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे.दिवाणी जज्ज सो. ज्युडी यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ४९४/२०२६

युवराज रतिलाल चव्हाण वगैरे ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ६ व जाबदेणार नं. १ व २ हे मयत कै. रतिलाल नामदेव सुतार यांचे कायदेशीर वारस असून मयत कै. रतिलाल नामदेव सुतार व अर्जदार हे मुळचे दहिवद ता. शिरपूर जिल्हा धुळे येथील राहणारे असून मयत कै. रतिलाल नामदेव सुतार यांचा दि. १९/८/२०२३ रोजी अर्जदार नं. ६ कडे नाशिक येथे राहत असतांना मृत्यू झाला हे अर्जदार नं. ५ हिमयताची पत्नी असून इतर अर्जदार व जाबदेणार हे मुले व मुली आहेत. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असलेने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे अर्जदार व जाबदेणार यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत अगर दिनांक २१/७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी स्वरुपात हरकती सादर करावे. अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार व जाब देणार नं. १ व २ यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत, असे गृहीत धरण्यात येवून वारसांचे प्रमाणपत्र यांना मागणी प्रमाणे देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर जिल्हा धुळे यांचे आदेशावरुन सदरची नोटीस प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी माझ्या सहिनी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

दि. ९/०७/२६ — आदेशावरुन

सही... कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस नि. ६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ५३४/२०२६

१) रत्नाबाई कैलास गोपाळ, रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे
२) विशाल कैलास गोपाळ, रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे
३) सोनाली कैलास गोपाळ, रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे
४) मोनिका कैलास गोपाळ, रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... जाबदेणार
X
कैलास विक्रम गोपाळ (मृत्यू : ता. ३०/०८/२०२०)
रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत नामे कैलास विक्रम गोपाळ हे दि. ३०/०८/२०२० रोजी मौजे दहिवद ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारीक कारणासाठी वारस दाखल्याची अवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. २१/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. / /२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही... कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सही... सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

पान १ वरुन

## मध्यपुर्वेत तणाव वाढल्याने भारताचा महत्वपूर्ण निर्णय

खरेदी करून, त्यावर प्रक्रिया करून ते अमेरिकन आणि युरोपियन बाजारात पेट्रोलियम उत्पादन म्हणून विकत आहे. या अहवालात असेही उघड झाले आहे की, जून २०२६ मध्ये ब्रिटनला सरकारी अनुदानाअंतर्गत रिलायन्सच्या जामनगर रिफायनरीमधून रशियन कच्च्या तेलापासून बनवलेल्या जेट इंधनाची पहिली खेप मिळाली. ज्याचे मूल्य सुमारे ६३ दशलक्ष युरो होते.

अमेरिका आणि इराणमधील संघर्ष पुन्हा एकदा पेटला असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा युद्धविराम अधिकृतपणे संपल्याची घोषणा केली होती. होर्मुझच्या समुद्रधुनीत इराणकडून व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांनंतर ट्रम्प यांनी ही आक्रमक भूमिका घेतली असून, दोन्ही देशांमध्ये पुन्हा लष्करी कारवाया सुरू झाल्या आहेत.

## शाळा बंद आंदोलन केले

शैक्षणिक कामकाज नियमित सुरू ठेवावे, असे निर्देश शिक्षण विभागाने सर्व शाळांना दिले होते. तरीदेखील काही जिल्ह्यांतील शाळांमध्ये शिक्षकांनी आंदोलनात सहभाग घेतल्याने मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. यानंतर विभागीय आणि जिल्हास्तरावरून माहिती संकलित करण्यात आली. या अहवालांच्या आधारे राज्यातील एकूण आठ हजार ६२९ शिक्षक आंदोलनात सहभागी झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांचा एक दिवसाचा पगार कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होणार नाही, याची जबाबदारी शाळा प्रशासन आणि शिक्षकांवर असल्याचे शिक्षण विभागाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. शाळा बंद राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते, त्यामुळे अशा प्रकारच्या आंदोलनांबाबत कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## शिंदखेडा येथे तरुणावर शुल्लक वादातून हल्ला

अरेरावी करीत शिवीगाळ, दमदाटी केली, तलवारीने हल्ला केल्याने मेहुलला दुखापत झाली. या प्रकरणी शिंदखेडा पोलिस ठाण्यात संशयित आकाश वडर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

## शहाद्यातील समाज कल्याण वस्तीगृहात अन्नातून

गंभीर आरोप आहे की, वस्तीगृहात सातत्याने निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते. यापूर्वीही अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केले. उलट तक्रार करणाऱ्यांना स्थानिक कर्मचाऱ्यांकडून दमदाटी केली जात असल्याचा धक्कादायक आरोप पालकांनी केला आहे.घटनेची माहिती मिळताच रात्री उशिरा जिल्हाधिकारी मिताली सेठी, पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, प्रांताधिकारी दीपक गिरासे, तहसीलदार संभाजी पाटील, पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, तसेच भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. मकरंद पाटील, पाणी पुरवठा सभापती प्रदीप ठाकरे, नगरसेवक मुनेशचंद जगदेव, माजी जिल्हा परिषद सदस्य मोहन शेवाळे,रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष अनिल कुवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुरेंद्र कुवर, आमदाराचे स्वीय सहायक हेमराज पवार आदिंनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेऊन बाधित विद्यार्थ्यांची विचारपूस केली आणि डॉक्टरांकडून प्रकृतीचा आढावा घेतला. तर खाजगी रुग्णालयाची वैद्यकीय टीम डॉ. प्रफुल्ल पाटील, डॉ. राकेश पाटील व कर्मचारी यांनी तातडीने धाव घेतली आणि विद्यार्थ्यांवर उपचार सुरू केले.प्रशासनाने वस्तीगृहातील उरलेल्या अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले असून विषबाधेचे नेमके कारण शोधण्याचे आदेश दिले आहेत. रवी सुकलाल बैसाणे, कीर्ती राज सखाराम घोडेसर, मोहित महेंद्र बैसाणे, रोशन सुरेश शिंदे, आदित्य अंबालाल सूर्यवंशी, दिनेश योगेश मोहिते, पंकज सिताराम कुवर, प्रदीप सूर्यवंशी, शंकर सिताराम कुवर, चेतन महिरे, धनेश विनोद सोनवणे, चंद्रकांत रवींद्र सोनवणे, मयूर रणशिंगे, सागर रणशिंगे, धम्मवीर रतिलाल घोडास, रोशन शिंदे या विद्यार्थ्यांवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व विद्यार्थी अनुसूचित जाती, नव बौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे सहावी ते दहावीत शिक्षण घेत असून, ते नंदुरबार जिल्ह्यासह राज्यातील विविध भागातून मोहिदा शिवारातील शासकीय वसतिगृहात वास्तव्यास आहेत.या घटनेमुळे समाज कल्याण विभागाच्या वस्तीगृहांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. समाजकल्याण विभागाचे संबंधित अधिकारी, जबाबदार स्थानिक कर्मचारी आणि कंत्राटदारावर कारवाई होणार का? भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना होणार का? याकडे आता संपूर्ण नंदुरबार जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## बळजबरीने विवाह कुंडाण्यात एकावर गुन्हा

तिला दमदाटी करुन मित्रांसह अन्य दोन संशयितांच्या मदतीने पिडीतेशी बळजबरीने वैदिक पध्दतीने लग्न लावले. तिची ईच्छा नसतांना नाशिक येथील मित्र हर्षल जाधव याच्या घरी नेत युवतीवर लैंगिक अत्याचार केला.

याप्रकरणी राजेंद्र सोनवणे याच्यासह राहुल जाधव, हर्षल जाधव (दोन्ही रा. नाशिक) यांच्याविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रभावती कापसे, खलिदा सैय्यद तपास करीत आहेत.

## पोलिस प्रशासन व हस्ती ग्रुप ऑफ स्कूलच्या वतीन

पुतळा येथून मार्गक्रमण करत शहीद अब्दुल हमीद स्मारकाजवळ रॅलीचा समारोप झाला. या मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी व्यसनाधिनतेवर आधारित इंग्रजी, हिंदी व मराठीत पथनाट्ये प्रत्येक चौकात सादर केली. पथनाटकांद्वारे अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे कौटुंबिक नुकसान तसेच तरुणाईचे धोक्यात जाणारे जीवनाचे जिवंत चित्रण उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. पथनाटकांचे उत्तम प्रस्तुती वेळी नागरिकांनी एकच गर्दी केली. बहुतेकांनी ते आपल्या मोबाईलमध्ये चित्रित करून घेतले. विद्यार्थ्यांनी नशा सोडा - आयुष्य जोडा, व्यसनमुक्त युवा - सक्षम भारताची ओळख, व्यसनाच्या त्याग करा - कुटुंबाच्या सन्मान करा, व्यसनमुक्त मन - आनंदी जीवन, व्यसनमुक्तीचा शपथ घेऊ - निरोगी समाज घडवू, नशा म्हणजे विनाश - संयम म्हणजे विकास अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या घोषणांमधून व्यसनमुक्त समाजाची गरज अधोरेखित केली. स्कूलच्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

रॅलीच्या यशस्वितेकरीता हस्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रझिया दाऊदी, हस्ती वर्ल्ड स्कूल प्राचार्य जिवन सपकाळे, हस्ती गुरुकुलचे मुख्याध्यापक सदाशिव महाजन, पोलिस उपनिरीक्षक इरफान खान, सोबतच समन्वयक मनोज ठाकूर, मंगलसिंग राजपूत पोलिस स्टेशनचा स्टाफ, शिक्षक, शिक्षिका सोबतच एन सी सी कॅडेट्स यांनी तर पथनाट्यकरिता प्रमुख हर्षल कुलकर्णी, सुमित चव्हाण, आनंद पवार, संजय मोरे, शिक्षिका क्रांती बोरसे, नरेश सावंत, भूषण पवार, सावन साळुंखे, कला शिक्षक राहुल भामरे, प्रमोद कोळी, कला शिक्षिका मीनाक्षी देसले यांनी परिश्रम घेतले. सिंधी समाज बांधवांनी पिण्याचे पाणी व शीतपेयांची सोय करून सामाजिक बाधिलकी जपली. हस्ती स्कूल नियमितपणे अशा स्वरूपाच्या जनजागृती रॅली मधून विद्यार्थ्यांना प्रेरित करते. यामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा वृद्धिंगत होण्यास सहाय्यभूत होते.

हस्ती स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली पथनाट्य उत्तम सामाजिक संदेश देणारी होती. विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे व एन सी सी विभागाचे कौतुक केले.

- दिनेश सोनवणे पोलिस निरीक्षक

## एस.आय.आर मोहिमेला शिवसैनिकांनी हलक्यात घेऊ नये

प्रमुखांनी घरोघरी जाऊन नागरिकांना एस.आर.आय मोहिमेचे महत्त्व पटवून द्यावे. ग्रामीण भागात अनेक नागरिकांना या मोहिमेची अजून पर्यंत माहिती नाहीये. कार्यकर्त्यांनी त्यांच्यापर्यंत माहिती पोहोचवून फॉर्म भरून घ्यावेत. यावेळी तालुक्यातील बुथ प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे संयोजन बीएलए प्रमुख कमलेश चौधरी, खुशाल चौधरी यांनी केले.

पान १ वरुन

## पार्श्वगायिका एस. जानकी यांचे ८८ व्या वर्षी निधन

जानकी अम्मा यांनी आपल्या कलेशी किंवा सन्मानाशी कधीही तडजोड केली नाही. म्हणूनच २०१३ मध्ये जेव्हा केंद्र सरकारने देशाचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मभूषण पुरस्कारासाठी त्यांची निवड केली, तेव्हा त्यांनी तो पुरस्कार स्पष्टपणे नाकारला. त्यावेळी भारतीय संगीतातील त्यांच्या दीर्घ आणि महत्त्वपूर्ण योगदानामुळे त्यांना भारतरत्न पुरस्कार खूप आधीच मिळायला हवा होता, असे त्यांचे म्हणणे होते. एस. जानकी यांचा जन्म २३ एप्रिल १९३८ रोजी आंध्र प्रदेशात झाला. त्यांचे वडील आयुर्वेदिक डॉक्टर होते. त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी पहिले तमिळ गाणे रेकॉर्ड केले. संगीत उद्योगाला ६० वर्षे समर्पित केल्यानंतर त्या २०१६ मध्ये निवृत्त झाल्या. पण त्यांनी २०१८ मध्ये एका तमिळ चित्रपटातून पुन्हा पदार्पण केले. एस. जानकी तमिळ, कन्नड, मल्याळम आणि हिंदी या भाषा अस्खलितपणे बोलायच्या. त्यांनी १९५९ मध्ये व्ही. रामप्रसाद यांच्याशी लग्न केले. त्यांनी एस. जानकी यांची कारकीर्द घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि प्रत्येक रेकॉर्डिंगमध्ये त्यांना साथ दिली. एस. जानकी यांनी आपली बहुतेक गाणी कन्नड आणि मल्याळम भाषेत गायली. त्यांनी वयाच्या नवव्या वर्षी बालकलाकार म्हणून पहिल्यांदा रंगमंचावर सादरीकरण केले होते.

### अठ्ठेचाळीस हजारावर गाणी

गायिका एस. जानकी यांनी सहा दशकांच्या कारकिर्दीत चित्रपट, अल्बम आणि रेडिओसाठी ४८,००० हून अधिक गाणी रेकॉर्ड केली. त्या भारतातील सर्वांत अष्टपैलू गायकांपैकी एक होत्या. त्यांनी तेलुगू, तमिळ आणि हिंदीसह वीस भारतीय भाषांमध्ये आणि अनेक परदेशी भाषांमध्ये आपल्या आवाजाची जादू पसरवली.

## मुख्यमंत्र्यांच्या व्यापक धोरणामुळे जास्तीत जास्त

जाहिर केली आहे. या योजनेचा लवकरच प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना दिला जाणार आहे. महाराष्ट्र विधानसभा अधिवेशनाच्या अंतिम आठवड्याच्या शेवटच्या दिवशी उत्तर देतांना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची ऐतिहासिक घोषणा केली आहे. महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मिळणारा ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभावरून आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत २ लाख रुपयांपर्यंत लाभ मिळणार आहे. याशिवाय प्रोत्साहनपर अनुदानासाठी २०२६-२७ या आर्थिक वर्षातील पीक कर्ज भरण्याची अटही रद्द केली करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता पूर्वीपेक्षा कर्जमुक्ती योजनेत लाभार्थींची संख्या वाढून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देतांनाच त्यांना पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्दात्त हेतूने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि भाजपा महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबविली आहे. या योजनेमुळे पात्र शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या बोझ्यातून बाहेर काढले जाणार आहे. शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेल्या कर्जमुक्ती निर्णयामुळे मा.आमदार कुणाल पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि भाजपा महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

## अपघातातील सर्वअधिक मृत्युचे

प्रत्येकाची जबाबदारी आहे. हा संदेश स्पष्टपणे दिसला पाहिजे, समाजातील काही जबाबदार वर्गाकडून या मोहिमेला समर्थन देण्याऐवजी किरकोळ उणीवा अधोरेखित केल्या जात आहेत, अशा मोहिमेला समर्थन देणे ही त्यांचीही सामाजिक जबाबदारी असताना ते समाजासमोर कोणता आदर्श निर्माण करत आहेत, याचे त्यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. जर समाजातील द्रोणाचार्यच असे विचार करू लागले, तर उद्याचा अर्जुन कसा घडणार ?

### अधीक्षक कार्यालयापासून सुरुवात

जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयापासूनच हेल्मेट सक्तीची सुरुवात केली. हेल्मेट न वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली. आपल्या कार्यालयापासूनच सुरुवात केली असून टप्प्याटप्प्याने हेल्मेट सक्ती ती नागरिकांवर लागू करण्यात येत आहे.

## वरून खालपर्यंत सर्वच बरबटलेले

लिहिले जाते. तशा बातम्या प्रसिध्द करवून घेतल्या जातात. हा प्रकार म्हणजे मी मारल्या सारखे करतो, तू रडल्या सारखे कर, असा आहे. सर्वसामान्य जनता याला हलकटपणा म्हणते. राज्यातील वरिष्ठ पातळीवरील नेत्यांचे हात भ्रष्टाचारात बरबटलेले आहेत. तर स्थानिक स्थानिक नेते आकंठ बुडले आहेत. आर्थिक व्यवहारात बरबटलेले लोकप्रतिनिधी आणि अधिकारी सर्वसामान्यांचे ऐकणार नाही, हे उघड आहे, असेही माजी आमदार गोटे यांनी पत्रकात म्हटले आहे.

पान १ वरुन

## धुळ्यात वृद्धेला मारहाण सोन्याची चैन हिसकावली

तोळ्याची सोन्याची पोत जबरदस्तीने हिसकावुन घेत पसार झाले. याप्रकरणी माधवी नेमाने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोघा संशयितांविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मयुर कंदारे याला पोलिसांनी अटक केली. निरीक्षक पोलीस हेमंत कुमार भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक पी. बी. मोहिते तपास करीत आहेत.

## जोशाबा मंडळातर्फे वृद्ध व दिव्यांगांसाठी

वर्षांवरील निराधार वृद्धांसाठी मसन्मान भोजन सेवाफ सुरू केली असून, गरजूंच्या सोयीनुसार दोन वेळा मोफत जेवण दिले जात आहे.

याशिवाय, दिव्यांग व रुग्णांसाठी मरुग्ण सेवा साहित्य केंद्रफ सुरू करण्यात आले असून, त्याद्वारे वॉकर, फोल्डिंग बेड, व्हीलचेअर आणि ऑक्सिजन मशीन यांसारखी महागडी वैद्यकीय साधने मोफत किंवा अत्यंत सवलतीच्या दरात दिली जात आहेत. विशेष म्हणजे, ज्यांचे पाय अपघातात कापले गेले आहेत, त्यांना मोफत कृत्रिम पाय आणि ज्यांचे हात कोपराच्या खाली ४ इंचपर्यंत कापले गेले आहेत, त्यांना मोफत कृत्रिम हात उपलब्ध करून दिला जाईल. या जनसेवेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## नेपाळमध्ये पुन्हा तरुणाईकडून आंदोलनाचा पवित्रा

तरुणांची मानसिकता, बेरोजगारी आणि सरकारी धोरणांविषयी गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचा असा विश्वास आहे की, जर सरकारने लवकरच प्रभावी कारवाई केली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र होऊ शकते.

बालेन बनले आंदोलनाचा चेहरा

महापौर झाल्यानंतर २०२२ मध्ये बालेन यांनी शहर स्वच्छ करण्यासाठी, वारसा जतन करण्यासाठी आणि भ्रष्टाचाराचा मुकाबला करण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या. बेकायदेशीर बांधकामांवरील कारवाईमुळे वाहतूक सुधारली. परंतु यामुळे विशेषतः रस्त्यावरील विक्रेते आणि झोपडपट्टीवासीयांकडून विरोधही झाला. बालेन शाह यांचा प्रभाव केवळ प्रशासनापुरता मर्यादित नव्हता. गेल्या वर्षी सप्टेंबरमधील आंदोलन दरम्यान त्यांची गाणी तरुणांच्या मनात घर करून राहिली. सोशल मीडियावरील बंदी, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि मंदावलेली अर्थव्यवस्था यांवरील जनतेच्या संतापाने या आंदोलनांना खतपाणी घातले. ज्यात ७७ लोकांचा मृत्यू झाला. आंदोलकांनी त्यांचे मनेपाळ हंसेकोफ हे गाणे एक प्रतीक म्हणून स्वीकारले.

चार मार्च रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्या पक्षाने प्रचंड विजय मिळवून नेपाळच्या पारंपरिक राजकीय पटलाला मोठा धक्का दिला. बालेन शाह यांनी झापा-५ मतदारसंघातून माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांचा पराभव करून आपले राजकीय सामर्थ्य सिद्ध केले. वयाच्या ३५ व्या वर्षी पदभार स्वीकारून ते नेपाळचे सर्वात तरुण पंतप्रधान बनले.

## निधन वार्ता

### श्रावण मिस्तरी



धुळे,दि.१२ - नगांव ता. धुळे येथील मूळ रहिवासी हल्ली मंगलमूर्ती कॉलनी देवपूर धुळे व गंगामाई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नगावचे सेवानिवृत्त कार्यालयीन अधीक्षक श्रावण केशव मिस्तरी (५८) यांचे दि.१२ रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांची अंतयात्रा सोमवार दि.१३ रोजी सकाळी ९ वा. त्यांचे धुळे येथील राहते घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## द्वितीय पुण्यस्मरण



### डॉ.महेश अंबर मोरे

तुमचं असणं सर्वकाही होतं.
आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं.
आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे

......आपला परिवार......

**आपली मंदा.. चंद्रकला महेश मोरे**

**(मुले)** नीलम- डॉ.नीलम विवेक आढाव, सोनम- डॉ.स्मिता निमेश सपकाळ, सिद्धार्थ - सिद्धार्थ महेश मोरे, निकी -डॉ.निखिल महेश मोरे **(जावाई)** विवेक गुणवंतराव आढाव, निमेश मधुकरराव सपकाळ **(नातू)** बेटू- किंजल निमेश सपकाळ, अद्वय विवेक आढाव, अन्वय विवेक आढाव **(भावंडे)** भैय्या- प्रा.डॉ.सुरेंद्र अंबर मोरे आणि सुषमा सुरेंद्र मोरे, बाई- सौ.पूजा प्रवीण वाघ आणि प्रवीण वाघ साहेब, लीना- सौ लीना प्रकाश बैसाणे आणि प्रकाश बैसाणे साहेब, आयु.सारिका जितेंद्र मोरे **(पुतणे)** भाऊ-कपिल सुरेंद्र मोरे आणि श्रेया कपिल मोरे, गुड्डी- स्वाती सुरेंद्र मोरे, बबली- प्राजक्ता राहुल घोलप, पप्पू- भाग्येश सुरेंद्र मोरे, बाळा-सम्यक जितेंद्र मोरे **(भाचे)** डॉली-समृद्धी गायकवाड, पिंकी (टिंकी)- अपर्णा त्रिभुवने, बबली- सायली जयंत रेगडे, राहुल- राहुल प्रकाश बैसाणे, रोहित- रोहित प्रकाश बैसाणे, भटू भाऊ-तीर्थेश प्रवीण वाघ


**पाहिजेत**
दवाखाना कामासाठी मुले-मुली पाहिजेत.
डॉ.महेंद्र शाह
संपर्क
9284557455

**पाहिजे**
अनुभवी लॉजिंग मॅनेजर पाहिजे.
कृपया लॉजिंग कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तींनीच संपर्क साधावा
आदर्शलॉज
जेल रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा मागे, धुळे

**पाहिजे**
अकाउंट कामासाठी स्त्री/पुरुष पाहिजे.
Tally Excal येणाऱ्यास प्राधान्य.
सेवा हॉस्पिटल
साक्री रोड, धुळे
9422786946

**पाहिजेत**
दुकान कामासाठी अनुभवी माणूस-१
अनुभवी Tally ऑपरेटर (पार्टटाईम) - १
7588517770
9922415601

**पाहिजेत**
मेडिकल होलसेलमध्ये कामासाठी मुले/महिला पाहिजेत
: संपर्क :
9422287821
9823716975

**घर व शेती विकणे**
घर व शेती विकणे आहे. गं.नं. ७ येथील सिटी सर्वे. नं. २२१९ येथील ८X५०= ४०० स्केअर फूट व अंबोडे येथील शेती ३ बिगे विकणे आहे.
- संपर्क -
9595606474
9923113130

**जमीन विकणे आहे**
एन.ए. जमीन विकणे आहे.
पेट्रल पंप, हॉटेल, फॅक्टरीसाठी अजंग गावाजवळ जळगाव रोडटच तीन एकर एन.ए. झालेली जमीन विकणे आहे.
8554800820

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक
श्री राहुल भाऊ सोनवणे
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी व यश लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!
शुभेच्छुक
श्री शिवकुमार डोंगरे
डॉ. श्री नैनेश देसले
डॉ. अमित चौधरी
डॉ. राजकिरण पटेल
श्री गजानन कोतकर
श्री कपिल तनेजा
श्री जुग्गी सेठी
श्री छत्रपाल भदाणे
व समस्त छत्रपाल भदाणे मित्रपरिवार
धुळे





आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...
atomberg "Why not?"







क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०